**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज**

द्वितीय अपिल क्र.रामाआ / ३२२६ / २०२४ / पुणे

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे - १

| अपिलार्थी | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलीय अधिकारी तथा |
| नीलिमा नितीन खैनार | सहा. मंडळाधिकारी, थेरगाव करसंकलन विभागीय कार्यालय, पिंपरी चिंचवड महानगरपालिका | प्रशासन अधिकारी, थेरगाव करसंकलन विभागीय कार्यालय, पिंपरी चिंचवड महानगरपालिका |

**( सुनावणी दिनांक - ३१ / १० /२०२५ )**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ पुणे यांचेकडे दि. २८.०५.२०२४ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. व्दितीय अपील दाखल करतांना प्रयोजनामध्ये " माहिती दिली नाही " असे कारण नमूद केले आहे. सदर व्दितीय अपीलाची सुनावणी घेणेत येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटिसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वादसूची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करून देणेत आलेली आहे. त्यानूसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

प्रस्तुत प्रकरणी, अपीलार्थी यांनी माहिती अर्जात जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहितीचा तपशील |
|---|---|
| २०.०२.२०२४ | ग्राहक क्र. १०४०२०२६०१ यावर नोंद असलेल्या व्यक्तींने नोंद घेणेकरीता कार्यालयाकडे सादर केलेली अर्ज, सहपत्रे, शपथपत्र इ. सर्व माहिती तसेच सन २०२२-२३ ची सांक्षाकित प्रॉपर्टी टॅक्स पावती. |

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी कथन केले की, "जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली नाही."

जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी केलेल्या कार्यवाहीचे अभिलेख आयोगास अप्राप्त आहे. अपिलार्थी यांना अद्यापही माहितीचे प्रदान झालेले नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

१. माहितीचा अधिकार अधिनियम - २००५ मधील कलम १९ (८) (क) (दोन) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, थेरगाव करसंकलन विभागीय कार्यालय, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना याप्रकरणी जनमाहिती अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असुन त्यांना आदेशित करण्यात येते की, अपिलार्थी यांच्या जोडपत्र "अ" मध्ये मागणी केलेली माहितीच्या अनुषंगाने कार्यालयात उपलब्ध असणारी व विहीत तरतूदीनूसार देय होणारी माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसांचे आत अपिलार्थीस कलम ७ (६) नुसार शीघ्र टपालाने विनामुल्य उपलब्ध करून द्यावी. त्याबाबतच पुर्तता अहवाल आयोगास सादर करावा.

उपरोक्त निर्देशांसह प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे.

जावक क्र. ३२२६ / २०२४ / पुणे 10180/2025 दिनांक - 20/11/25